'सहायक संचालक, ग्रंथालय / ग्रंथपाल महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट ब' दि. ८ डिसेंबर, २०१४

# A

**2014**

CODE : **NO5**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

## प्रश्नपुस्तिका

## चाळणी परीक्षा

वेळ : 1 ( एक ) तास

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 200

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ↑ केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | ↑ शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार पर्यायांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात नसणारे भारतातील राज्य खालीलपैकी कोणते ?
   (1) गुजरात (2) उत्तरांचल (3) पंजाब (4) अरूणाचल प्रदेश

2. 'इफ्ला' या संस्थेचे मूळ नाव खालीलपैकी कोणते होते ?
   (1) इंटरनॅशनल लायब्ररी असोसिएशन
   (2) इंटरनॅशनल बिब्लिऑग्राफिकल असोसिएशन
   (3) इंटरनॅशनल लायब्ररी ॲण्ड बिब्लिऑग्राफिकल कमिटी
   (4) इंडियन लायब्ररी ॲण्ड बिब्लिऑग्राफिकल असोसिएशन

3. 'इंडिया अ रेफरन्स ॲन्युअल' हे वार्षिक प्रकाशन कोणामार्फत प्रकाशित केले जाते ?
   (1) टाईम्स ऑफ इंडिया प्रकाशन विभाग
   (2) राष्ट्रीय ग्रंथालय कोलकाता
   (3) माहिती आणि प्रसारण विभाग, भारत सरकार
   (4) माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, महाराष्ट्र-राज्य

4. सार्वजनिक ग्रंथालये कायदा करणारे भारतामधील कालानुक्रमे तिसरे राज्य कोणते ?
   (1) कर्नाटक (2) एकीकृत आंध्र प्रदेश (3) तामिळनाडू (4) पश्चिम बंगाल

5. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी संपादित केलेल्या ज्ञानकोशाचे नाव काय ?
   (1) महाराष्ट्र परिचय (2) महाराष्ट्र वाक्‌संप्रदाय कोश
   (3) महाराष्ट्रीय ज्ञानकोश (4) महाराष्ट्रीय व्यावहारिक ज्ञानकोश

6. महाराष्ट्र शासनाच्या विद्यमान अनुदान दरानुसार मान्यताप्राप्त इतर 'अ' वर्गाच्या ग्रंथालयाकरिता जास्तीत जास्त किती रुपये कमाल परीरक्षण अनुदान मिळते ?
   (1) ₹ 1,92,000 (2) ₹ 3,84,000 (3) ₹ 2,88,000 (4) ₹ 1,44,000

7. संदर्भ सेवा ही कोणत्या दोन प्रकारची असते ?
   (1) संदर्भ आणि रेफरल सेवा (2) प्रचलित जागरुकता सेवा आणि निवडक माहिती प्रसारण
   (3) शीघ्र आणि विलंबित संदर्भ सेवा (4) प्रचलित आणि रेफरल सेवा

8. मान्यताप्राप्त राज्य ग्रंथालय संघाला दरवर्षी विद्यमान दराने कमाल परीरक्षण अनुदान किती रुपये मिळते ?
   (1) ₹ 50,000 (2) ₹ 1,00,000 (3) ₹ 1,50,000 (4) ₹ 2,00,000

**कच्च्या कामासाठी जागा**

**9.** खालीलपैकी कोणते सॉफ्टवेअर लायब्ररीसाठीचे ओपन सोर्स सॉफ्टवेअर आहे ?
(1) लिबसीस (2) स्लीम (3) कोहा (4) लायब्रेरीयन

**10.** 'आय.एस्.बी.एन.' सध्या किती अंकी आहे ?
(1) आठ (2) दहा (3) बारा (4) तेरा

**11.** डी.बी.एम्.एस्. म्हणजे काय ?
(1) माहिती संचाची यांत्रिक पद्धती (2) माहिती संचाची यंत्र पद्धती
(3) माहिती संच व्यवस्थापन पद्धती (4) डायरेक्टर बोर्ड ऑफ मेकॅनिकल सिस्टिम

**12.** वर्गीकृत तालिका म्हणजे काय ?
(1) ग्रंथ नाम तालिका (2) लेखक तालिका
(3) विषय-तालिका (4) कोश तालिका

**13.** 'सूचींची सूची' कोणत्या प्रकारच्या संदर्भसाधन प्रकारात मोडते ?
(1) प्राथमिक (2) द्वितीयक (3) तृतीयक (4) चतुर्थक

**14.** सध्या ग्रंथांसाठीच्या आय.एस.बी.एन. (ISBN) मध्ये सुरवातीस खालीलपैकी कोणते तीन अंक नमूद असतात ?
(1) 675 (2) 776 (3) 877 (4) 978

**15.** महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम 1967 अंतर्गत तरतुदीनुसार राज्य ग्रंथालय परिषदेचे पदसिद्ध सदस्य सचिव कोण असतो ?
(1) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री (2) उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री
(3) ग्रंथालय संचालक (4) प्रधान सचिव

**16.** शासनाकडून देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट ग्रंथालये, कार्यकर्ते व कर्मचारी पुरस्कारासाठी निवड करण्याकरिता कोणाच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरावर समिती कार्यरत आहे ?
(1) विभागाचे मंत्री (2) विभागाचे राज्य मंत्री
(3) विभागाचे प्रधान सचिव (4) ग्रंथालय संचालक

**17.** ग्रंथ दाखल नोंदीबाबत खालीलपैकी कोणती कृती ग्रंथालय शास्त्र दृष्ट्या अधिक योग्य आहे ?
(1) एकाच ग्रंथाच्या अनेक प्रती खरेदी केल्या असल्यास त्या सर्व प्रतींना एकच दाखल क्रमांक द्यावयाचा असतो.
(2) एखादा ग्रंथ एकापेक्षा अधिक खंडांमध्ये प्रकाशित झालेला असल्यास त्या सर्व खंडांना एकच दाखल क्रमांक द्यावयाचा असतो.
(3) ग्रंथालयामध्ये खरेदी करण्यात आलेल्या प्रत्येक प्रतीला वेगळा दाखल क्रमांक द्यावयाचा असतो.
(4) एकाच ग्रंथाच्या अनेक प्रतींसाठी एकच दाखल नोंद क्रमांक देऊन त्या शीर्षक नोंदीपुढे जितक्या प्रती असतील ती संख्या कंसामध्ये नोंद करावयाची असते.

**कच्च्या कामासाठी जागा**

18. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या उत्कृष्ट ग्रंथालयांना पुरस्कार योजनेचा लाभ मिळालेले महाराष्ट्रातील पहिले ग्रंथालय कोणते आहे ?
(1) मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई
(2) सीताराम दीक्षित वाचनालय, नागपूर
(3) पुणे मराठी ग्रंथालय, पुणे
(4) हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर

19. 'विषय शब्दकोश' म्हणजे काय ?
(1) जो काही विषयांशी संबंधित असतो.
(2) जो एका विशिष्ट विषयाशी संबंधित असतो.
(3) जो सर्व विषयांशी संबंधित असतो.
(4) जो कोणत्याही विषयाशी संबंधित नसतो.

20. डी.डी.सी. पध्दतीमध्ये किती मुख्य वर्गांमध्ये सर्व मानवी ज्ञान-विषय समाविष्ट केले गेलेले आहेत ?
(1) दहा (2) शंभर (3) दोनशे (4) तिनशे

21. ग्रंथालय संचालनालयामध्ये संचालनालयाच्या मुख्यालयासह एकूण किती कार्यालये कार्यरत आहेत ?
(1) 44 (2) 50 (3) 49 (4) 48

22. 'इन्फ्लिबनेट' चे राष्ट्रीय केंद्र कोठे आहे ?
(1) हैद्राबाद (2) दिल्ली (3) अहमदाबाद (4) बेंगलोर

23. 'वार्षिके' आणि 'दैनिके' ही कशामध्ये समाविष्ट केली जात नाहीत ?
(1) ज्ञानकोश (2) शब्दकोश (3) ग्रंथ (4) नियतकालिके

24. भारत सरकारने प्रा.डी.पी. चटोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने भारताच्या ग्रंथालय व माहिती पद्धती संबंधी धोरणाचा मसुदा-अहवाल कोणत्या वर्षी सादर केला होता ?
(1) 1985 (2) 1986 (3) 1987 (4) 1992

25. डॉ. एस्. आर. रंगनाथन यांच्या वर्गीकृत तालिकेची पहिली आवृत्ती कोणत्या वर्षी प्रसिद्ध झाली ?
(1) 1930 (2) 1934 (3) 1945 (4) 1950

26. ग्रंथालय संचालनालयामध्ये संचालक पद वगळून किती वर्ग 1 अधिकाऱ्यांची पदे आहेत ?
(1) 4 (2) 5 (3) 44 (4) 35

27. डी.डी.सी. पद्धती मध्ये विषयाचे वर्गीकरण कशाप्रकारे होते ?
(1) मुख्याकडून उप-शिर्षाकडे
(2) उप-शिर्षाकडून मुख्याकडे
(3) साधारणाकडून विशिष्टाकडे
(4) विशिष्टाकडून साधारणाकडे

**कच्च्या कामासाठी जागा**

28. 'सोल' ही ग्रंथालयीन प्रणाली कोणी विकसित केली ?
(1) डेलनेट (2) इन्फ्लिबनेट (3) एन्.आय.सी. (4) जानेट

29. ग्रंथ दाखल नोंद रजिस्टर मधील ग्रंथांच्या किंमतीच्या नोंदींसंबंधी खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?
(1) सूट वजा जाता ग्रंथालयातील ग्रंथ संपदेची एकूण किंमत किती आहे ते समजते.
(2) ग्रंथालयातील ग्रंथसंपदेची एकूण किंमत किती आहे ते समजते.
(3) ग्रंथ खरेदीवर सरासरी किती टक्के सूट मिळाली आहे ते समजते.
(4) ग्रंथ खरेदीवर एकूण किती रक्कम सूट म्हणून मिळाली ते समजते.

30. खालीलपैकी कोणत्या ग्रंथालयाला ग्रंथ प्रदान अधिनियमान्वये ग्रंथ मिळत नाहीत ?
(1) दिल्ली पब्लिक लायब्ररी, दिल्ली (2) कोनेमरा पब्लिक लायब्ररी, मद्रास
(3) स्टेट सेंट्रल लायब्ररी, मुंबई (4) राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान ग्रंथालय, कोलकाता

31. ग्रंथालयाच्या वार्षिक अहवालात कोणते दोन भाग समाविष्ट असतात ?
(1) प्राथमिक आणि दुय्यम (2) विश्लेषणात्मक आणि पद्धतशीर
(3) वर्णनात्मक आणि संख्यात्मक (4) सर्वोच्च आणि खालचा

32. दशांश वर्गीकरणात भारतासाठी कोणता वर्गांक आहे ?
(1) 954 (2) 954.3 (3) 954.79 (4) 954.4

33. 'यु.बी.सी.' हे खालीलपैकी कशाचे संक्षिप्त रूप आहे ?
(1) युनिव्हर्सल बुक कंट्रोल (2) युनिव्हर्सल बुक कलेक्शन
(3) युनिव्हर्सल बिब्लिऑग्राफी ऑफ कम्प्युटर्स (4) युनिव्हर्सल बिब्लिऑग्राफिक कंट्रोल

34. ग्रंथ प्रदान अधिनियमान्वये देशातील किती ग्रंथालयांकडे प्रकाशकाने प्रकाशित केलेल्या पुस्तकाची प्रत पाठविणे बंधनकारक आहे ?
(1) दोन (2) तीन (3) चार (4) पाच

35. भारत सरकारने कॉपीराईट ॲक्ट खालीलपैकी कोणत्या वर्षी केला आहे ?
(1) 1954 (2) 1955 (3) 1957 (4) 1960

36. कोणत्या संस्थेने 'इन्फ्लिबनेट' ची निर्मिती केली ?
(1) सी.एस.आय.आर. (2) इन्सडॉक (3) निस्साट (4) युजीसी

**कच्च्या कामासाठी जागा**

37. 'ब्राऊन' पद्धतीचा ग्रंथालयात काय उपयोग होतो ?
(1) ग्रंथ वर्गीकरणासाठी (2) ग्रंथ निवडीसाठी
(3) उपभोक्त्यांना ग्रंथ देवघेव करण्यासाठी (4) ग्रंथ तालिकीकरणासाठी

38. ग्रंथालयातील तालिका उपयोगासंदर्भात अयोग्य पर्याय ओळखा.
(1) वाचकाला त्याच्या आवडीचा ग्रंथ शोधण्यास माहिती मिळते.
(2) वाचकाला त्याच्या आवडीच्या विषयासंबंधी माहिती घेता येते.
(3) नवीन खरेदी करताना ग्रंथपालांना पूर्वी ग्रंथालयात ग्रंथ घेतला आहे का हे शोधण्यास मदत होते.
(4) सर्व प्रकाशित माहिती मिळते.

39. डी.डी.सी. च्या इंडेक्सला काय म्हणतात ?
(1) बुक इंडेक्स (2) रिलेटिव्ह इंडेक्स (3) कंपॅरेटिव्ह इंडेक्स (4) सिक्वेन्शिअल इंडेक्स

40. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम 1967 मध्ये अंतर्भूत प्रकरण सहावे हे कशा संबंधी आहे ?
(1) अहवाल व निरीक्षण (2) ग्रंथालय विभाग
(3) वित्त व हिशेब (4) ग्रंथालय समित्या

41. डी.डी.सी. मध्ये कोणताही वर्गांक किमान किती अंकी असावा लागतो ?
(1) दोन (2) तीन (3) चार (4) पाच

42. 'गॅझेट' हे खालीलपैकी कोणत्या स्वरूपाची माहिती देते ?
(1) स्थळांचा इतिहास (2) जुन्या नोंदी
(3) कार्यालयीन जाहीर प्रगटन आणि घोषणा (4) पहाण्या लायक स्थळांची माहिती

43. ज्या ग्रंथालयामध्ये नैसर्गिक वाचन साहित्य नाही, वाचन कक्ष नाही किंवा मदतनीस कर्मचारी नाहीत अशा ग्रंथालयांना काय म्हणतात ?
(1) भिंती विरहीत ग्रंथालये (2) अंकीय ग्रंथालये
(3) आभासी ग्रंथालये (4) संगणकीय ग्रंथालये

44. अमेरिकेमधील न्यू जर्सी येथील सार्वजनिक ग्रंथालयात कोणत्या वर्षी 'नेवार्क' ही पद्धती प्रथम सुरू करण्यात आली ?
(1) 1895 (2) 1900 (3) 1905 (4) 1910

**कच्च्या कामासाठी जागा**

45. राज्य स्तरीय उत्कृष्ट कर्मचाऱ्यास पुरस्कारासोबत किती रक्कम रोख स्वरूपात प्रदान करण्यात येते ?

(1) ₹ 10,000 (2) ₹ 15,000 (3) ₹ 25,000 (4) ₹ 50,000

---

46. ग्रंथ दाखल नोंद क्रमांक म्हणजे खालीलपैकी काय ?

(1) विशिष्ट ग्रंथालयामधील ग्रंथाचा बोधांक.

(2) विशिष्ट ग्रंथालयामधील ग्रंथाला दिलेला एकमात्र क्रमांक.

(3) विशिष्ट ग्रंथालयामधील ग्रंथाचा ग्रंथांक.

(4) विशिष्ट ग्रंथालयामधील ग्रंथाचा वर्गांक.

---

47. राज्य शासनाकडून उत्कृष्ट असणाऱ्या 'ग्रामीण-अ' वर्ग ग्रंथालयासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कारासह किती रोख रक्कम प्रदान करण्यात येते ?

(1) ₹ 40,000 (2) ₹ 50,000 (3) ₹ 60,000 (4) ₹ 70,000

---

48. 'माहिती' म्हणजे काय ?

(1) संदर्भहीन डेटा (2) विस्कळीत डेटा किंवा तपशील

(3) असंघटित तपशिलांची अर्थहीन रचना (4) संदर्भासह असणारा अर्थपूर्ण तपशील

---

49. 'भग्नक्रम' ही संकल्पना कशाशी संबंधित आहे ?

(1) ग्रंथबांधणी (2) तालिकीकरण (3) पुस्तक मांडणी (4) बुक ऑर्डरींग

---

50. भारताच्या राष्ट्रीय ग्रंथालयाला प्रकाशकाने कोणत्या कायद्यान्वये प्रकाशित झालेली पुस्तके पाठविणे बंधनकारक आहे ?

(1) ग्रंथ मुद्रण व नोंदणी अधिनियम 1867 (2) ग्रंथ प्रदान अधिनियम 1954

(3) संस्था नोंदणी कायदा 1860 (4) मालकी हक्क कायदा 1985

---

51. खालीलपैकी कोणत्या राज्याच्या सार्वजनिक ग्रंथालय कायद्यामध्ये प्रत्येक स्थानिक ग्रंथालय मंडळ परिसरातील मालमत्ता किंवा इमारत करावर उप-कराच्या स्वरूपात रुपयामागे 6 पैसे ग्रंथालय कराची तरतूद आहे ?

(1) गोवा (2) मिझोराम (3) तामिळनाडू (4) महाराष्ट्र

---

52. 'आय.एस्.बी.एन्.' दहा अंकी कोणत्या वर्षापासून करण्यात आला होता ?

(1) 1970 (2) 1972 (3) 2005 (4) 2007

---

**कच्च्या कामासाठी जागा**

53. 'ग्रंथालय सप्ताह' कोणत्या कालावधीत साजरा केला जातो ?

(1) 14 जानेवारी ते 20 जानेवारी
(2) 14 एप्रिल ते 20 एप्रिल
(3) 14 सप्टेंबर ते 20 सप्टेंबर
(4) 14 नोव्हेंबर ते 20 नोव्हेंबर

---

54. 1939 मध्ये मुंबई राज्य सरकारने नेमलेल्या फैजी समितीचे सदस्य सचिव खालीलपैकी कोण होते ?

(1) डॉ.पी.एम्. जोशी
(2) एस्.एल. कापडी
(3) आर.पी. कर्वे
(4) पब्लिक रिलेशन्स ऑफिसर मुंबई सरकार

---

55. डॉ. रंगनाथन यांची द्विबिंदु वर्गीकरण पध्दती कोणत्या वर्षी प्रथम प्रकाशित झाली ?

(1) 1931 (2) 1932 (3) 1933 (4) 1934

---

56. ग्रंथांची दाखलनोंद ग्रंथांच्या बिलांमधील कोणती बाब विचारात घेऊन करावयाची असते ?

(1) बिलांमध्ये समाविष्ट ग्रंथांच्या किंमतींच्या उतरत्या क्रमाने.
(2) बिलांमध्ये समाविष्ट ग्रंथांच्या प्रकाशन वर्षांच्या कालानुक्रमाने.
(3) बिलांमध्ये समाविष्ट ग्रंथांच्या विषय गटांप्रमाणे.
(4) बिलांमध्ये समाविष्ट दिनांक व ग्रंथांच्या नोंदींच्या क्रमाने.

---

57. ग्रंथालयामध्ये ग्रंथ दाखल नोंदवही का ठेवण्यात येते ?

(1) ग्रंथांची नोंद करण्यासाठी.
(2) ग्रंथ आणि नियतकालिकांच्या नोंदी करण्यासाठी.
(3) ग्रंथालयात ग्रंथोपार्जन ज्या क्रमाने झाले तशा त्यांच्या नोंदी करण्यासाठी.
(4) ग्रंथालयात आणलेल्या प्रत्येक घटकाची नोंद करण्यासाठी.

---

58. 'क्लासिफिकेशन' हा शब्द खालीलपैकी कोणत्या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे ?

(1) क्लासिफाय (2) क्लास (3) क्लासिस (4) क्लासिकल

---

59. 'युनियन कॅटलॉग' म्हणजे खालीलपैकी काय ?

(1) ग्रंथालयातील सर्व साहित्याची सूची
(2) राष्ट्रीय ग्रंथालयातील सर्व साहित्याची सूची
(3) दोन किंवा दोनापेक्षा अधिक ग्रंथालयांमधील सर्व साहित्याची सूची
(4) विशिष्ट ग्रंथालयामधील सर्व साहित्याची सूची

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**60.** अमेरिकेमधील बोस्टन येथील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये कोणत्या वर्षी नीना ब्राऊन यांनी 'ब्राऊन' ही पद्धती सूचविली होती ?

(1) 1890 (2) 1895 (3) 1900 (4) 1905

---

**61.** 'दि स्टेट्समन्स इयर बुक' कोणत्या ठिकाणावरून प्रकाशित होते ?

(1) वॉशिंग्टन (2) वॉशिंग्टन-(डी.सी.) (3) लंडन (4) न्यूयॉर्क

---

**62.** खालील विषय त्यांच्या डी.डी.सी. मधील चढत्या विषय क्रमाने लावल्यास बरोबर जुळणारा पर्याय ओळखा.

(a) पदार्थ विज्ञान (b) सांख्यिकी शास्त्र

(c) भूगोल (d) लोकप्रशासन

**पर्यायी उत्तरे :**

(1) (d), (b), (c), (a) (2) (c), (b), (a), (d)

(3) (b), (d), (a), (c) (4) (a), (c), (b), (d)

---

**63.** डी.डी.सी. पध्दती कोणत्या वर्षी प्रथम प्रकाशित झाली ?

(1) 1875 (2) 1876 (3) 1877 (4) 1878

---

**64.** 'ग्रंथोपार्जन' म्हणजे खालीलपैकी काय ?

(1) खरेदी केलेल्या ग्रंथांचे वर्गीकरण करण्याची प्रक्रिया.

(2) खरेदी केलेल्या ग्रंथांचे तालिकीकरण करण्याची प्रक्रिया.

(3) ग्रंथालयासाठी विविध मार्गांनी नवनवीन व उपयुक्त ग्रंथांची निवड करुन ते प्राप्त करण्याची क्रिया.

(4) फक्त दुर्मीळ ग्रंथ जतन करण्याची क्रिया.

---

**65.** एखाद्या विषयाशी संबंधित सर्व प्रलेख एका जागी एकत्र आणण्यासाठी कोणती प्रक्रिया करावी लागते ?

(1) प्रलेखन (2) तालिकीकरण (3) वर्गीकरण (4) निर्देशन

---

**66.** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या कोलकाता येथील कार्यालय प्रमुखाचे पदनाम काय आहे ?

(1) संचालक (2) मुख्य प्रशासकीय अधिकारी

(3) महासंचालक (4) मुख्य कार्यकारी अधिकारी

---

**67.** कार्डेक्स पद्धती कशासाठी वापरली जाते ?

(1) ग्रंथांची नोंद ठेवण्यासाठी (2) हस्तलिखितांच्या नोंदींसाठी

(3) नियतकालिकांच्या नोंदींसाठी (4) नकाशांची नोंद ठेवण्यासाठी

---

**कच्च्या कामासाठी जागा**

68. ओपॅक (OPAC) हे खालीलपैकी कशाचे संक्षिप्त रूप आहे ?

(1) ओहायो प्रॉव्हिन्स ॲक्विझिशन कन्शॉरशिया.

(2) ऑनलाईन पब्लिक ॲक्सेस कॅटलॉग .

(3) ऑनलाईन पिरियॉडिक परचेस ॲण्ड कॅटलॉग.

(4) ओहायो पब्लिक ॲण्ड ॲकॅडमिक कॅटलॉग.

---

69. भारतातील विद्यापीठीय ग्रंथालयांच्या संगणकीय जाळ्याला काय म्हणतात ?

(1) डेलनेट (2) आरनेट (3) इन्फ्लिबनेट (4) इनेट

---

70. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधन सामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम 1970 मधील तरतुदींनुसार विद्यमान परीरक्षण अनुदान दराप्रमाणे 'जिल्हा अ' दर्जाच्या व 'जिल्हा ब' दर्जाच्या कमाल अनुदान मर्यादा रकमांमध्ये किती रकमेचा फरक आहे ?

(1) ₹ 2,88,000 (2) ₹ 2,66,000 (3) ₹ 3,36,000 (4) ₹ 3,84,000

---

71. माहिती शोध पद्धतीत जेंव्हा एका संज्ञे ऐवजी दोन किंवा अधिक संज्ञांची आवश्यकता असते तेंव्हा कशाचा उपयोग करतात ?

(1) बायनरी लॉजिक (2) बुलीयन लॉजिक (3) तर्कशास्त्र (4) चालक

---

72. वर्गीकरणाच्या खालील पध्दतींचा त्यांच्या प्रथम प्रकाशित वर्षाच्या कालानुक्रमे जुळणारा पर्याय ओळखा.

**वर्गीकरण पध्दती :**

(a) डी.डी.सी. (b) सी.सी. (c) यु.डी.सी. (d) एल.सी.सी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (d), (b), (c), (a) (2) (a), (d), (c), (b)

(3) (b), (a), (d), (c) (4) (c), (d), (a), (b)

---

73. राज्य शासनाकडून उत्कृष्ट ग्रंथालये, कार्यकर्ते व कर्मचारी यांना दरवर्षी जे पुरस्कार देण्याचे ठरविले आहे त्यासाठी पुरस्कारासोबत द्यावी लागणारी रोख रक्कम एकूण किती होते ?

(1) ₹ 2,50,000 (2) ₹ 3,50,000 (3) ₹ 4,50,000 (4) ₹ 5,50,000

---

74. ग्रंथ दाखल नोंदवहीचा प्रमाणभूत आकार काय आहे ?

(1) 18″ × 15″ (2) 16″ × 13″ (3) 20″ × 17″ (4) 25″ × 21″

---

कच्च्या कामासाठी जागा

75. छत्तीसगड सार्वजनिक ग्रंथालय अधिनियमामध्ये जिल्हा ग्रंथालय समितीचे चेअर पर्सन खालीलपैकी कोण असण्याची तरतूद आहे?

(1) शिक्षण खात्याचे मंत्री (2) शिक्षण खात्याचे सचिव

(3) जिल्हाधिकारी (4) जिल्हा शिक्षणाधिकारी

---

76. विद्यमान अनुदानविषयक नियमांनुसार दहा हजार ते पंचवीस हजार पर्यंत लोकसंख्या असलेल्या गावामध्ये किती सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदानासाठी शासनमान्यता देण्याची तरतूद आहे?

(1) 4 (2) 3 (3) 2 (4) 5

---

77. खालील नमूद ग्रंथालयासाठीचे सॉफ्टवेअर व ते विकसित करणाऱ्या संबंधित संस्था यांच्या योग्य जोड्या जुळणारा पर्याय ओळखा :

| **सॉफ्टवेअर्स यादी** | | **संस्था यादी** | |
|---|---|---|---|
| (a) | ग्रंथालया | (i) | निसॅट/डेसिडॉक डी.एस.आय.आर/न्यू दिल्ली |
| (b) | लिबसीस | (ii) | अल्गोरिथीम्स - पुणे |
| (c) | स्लीम | (iii) | लिबसीस कॉर्पोरेशन -दिल्ली |
| (d) | संजय | (iv) | इन्सडॉक-न्यू दिल्ली |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

---

78. 'हूज हु ऑफ इंडियन रायटर्स' याचे प्रकाशक कोण आहेत?

(1) ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस (2) सेज प्रकाशन

(3) साहित्य अकादमी (4) मॅकमिलन प्रेस

---

79. U.A.P. (यु.अे.पी.) हे खालीलपैकी कशाचे संक्षिप्त रूप आहे?

(1) युनिव्हर्सिटी ॲकॅडेमिक पब्लिकेशन्स (2) युनिव्हर्सल ॲव्हेलेबिलीटी ऑफ पब्लिकेशन्स

(3) युनिव्हर्सल ॲसोसिएशन ऑफ पब्लिशर्स (4) युनिव्हर्सल ॲक्सेस फॉर पिरीयॉडीकल्स

---

80. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोणत्या वर्षी स्थापन झाले?

(1) 1948 (2) 1950 (3) 1972 (4) 1982

---

**कच्च्या कामासाठी जागा**

81. राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानच्या स्थापनेच्या हेतूंमध्ये/उद्देशांमध्ये खालीलपैकी कोणता उद्देश समाविष्ट नाही ?
(1) देशातील सर्व राज्यांनी सार्वजनिक ग्रंथालये कायदा करावा यासाठी प्रयत्न करणे.
(2) राष्ट्रीय ग्रंथालय व माहिती पध्दतीचे धोरण ठरविणे.
(3) ग्राम ग्रंथालय ते राष्ट्रीय ग्रंथालयापर्यंत उत्कृष्ट पद्धतीची ग्रंथालयांची साखळी तयार करणे.
(4) देशातील सार्वजनिक ग्रंथालयांमधील कर्मचाऱ्यांना दर दहा वर्षांनी वेतन आयोग नियुक्त करणे.

82. मुंबई प्रांतिक सरकारने 1939 साली प्राचार्य अे.अे.अे. फैजी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीमध्ये अध्यक्षांसह एकूण किती सदस्य होते ?
(1) दोन (2) तीन (3) चार (4) पाच

83. विद्यमान नियमांनुसार 'जिल्हा अ' दर्जाच्या ग्रंथालयास दरवर्षी किमान किती सांस्कृतिक कार्यक्रम करणे आवश्यक आहे ?
(1) पाच (2) दहा (3) पंधरा (4) वीस

84. युनेस्कोने खालीलपैकी कोणता दिवस 'जागतिक ग्रंथ दिन' म्हणून निश्चित केला आहे ?
(1) 1 जानेवारी (2) 31 मार्च (3) 1 एप्रिल (4) 23 एप्रिल

85. एखाद्या ग्रंथाविषयीच्या सविस्तर माहितीला - शीर्षक, लेखक, प्रकाशक, प्रकाशन स्थळ, प्रकाशन काल, पृष्ठ संख्या, किंमत इ. यांना काय म्हणतात ?
(1) छाप (2) संग्रह (3) प्रकाशन वृत्त (4) ग्रंथ सूचीय माहिती

86. डीजीटल लायब्ररी साठीचे उपयुक्त सॉफ्टवेअर कोणते ?
(1) सोल (2) कोहा (3) ग्रीन स्टोन (4) स्लीम

87. ग्रंथ खरेदी आदेश पाठविण्यापूर्वी ग्रंथालयात कोणती कामे केली जात नाहीत ?
(1) पूर्वी या ग्रंथाची मागणी नोंदविली आहे काय याची तपासणी.
(2) कुठल्याही प्रक्रियेशिवाय ग्रंथ खरेदी आदेश पाठविला जाणे.
(3) समान लेखक व शीर्षकाचा ग्रंथ उपलब्धता पडताळणी करणे.
(4) दुसऱ्या कोणत्या प्रकारात ग्रंथ उपलब्ध आहे का याचा शोध घेतला जाणे.

**कच्च्या कामासाठी जागा**

88. ग्रंथ प्रदर्शने भरविणे, विविध उपयुक्त विषयांवर व्याख्याने आयोजिणे, वक्तृत्व-निबंध-वाद-विवाद स्पर्धा घेणे, वाचक व्यासपीठ, कथा कथन इ. असे कार्यक्रम ग्रंथालयाने आयोजिण्यामागे कोणता हेतू असतो ?
(1) ग्रंथपालांना सतत काही तरी कामाला लावणे
(2) अनुदान मिळण्यासाठी खर्च करणे गरजेचे असते
(3) वाचकांना ग्रंथालयाकडे आकृष्ट करणे व वाचन रुची निर्माण करणे
(4) अशा स्वरुपाच्या कार्यक्रमाच्या नावाखाली देणग्या मिळविणे.

---

89. कोश तालिकेचे नियम कोणी तयार केले ?
(1) सी.सी. जेवेट (2) ए. पॅनिझी (3) सी.ए. कटर (4) एस्. लुबेतझ्की

---

90. युनेस्को ने 'आंतरराष्ट्रीय ग्रंथ वर्ष' कधी साजरे केले ?
(1) 1952 (2) 1962 (3) 1972 (4) 1982

---

91. संगणक प्रोग्रॅम मधील त्रुटींना काय म्हणतात ?
(1) व्हायरस (2) स्पॅम (3) बग (4) क्रॅकर्स

---

92. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी कोण असते ?
(1) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री
(2) केंद्रीय मनुष्यबळ विकास राज्यमंत्री
(3) केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री वा त्यांनी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी
(4) केंद्रीय माहिती व प्रसारण विभागाचे मंत्री

---

93. शं.ग. दाते, दि.वि. काळे व शं.ना. बर्वे यांनी संपादित केलेली 'मराठी नियतकालिकांची सूची' कोणत्या कालावधीतील लेखांची सूची आहे ?
(1) 1900 ते 1950 (2) 1800 ते 1950 (3) 1850 ते 1950 (4) 1800 ते 1900

---

94. 'एशियन रेकॉर्डर' हे कोणत्या ठिकाणाहून प्रकाशित होते ?
(1) लंडन (2) न्यूयॉर्क (3) दिल्ली (4) श्रीलंका

---

95. विश्वकोशाचे प्रामुख्याने दोन प्रकार कोणते ?
(1) गौण आणि विशेष (2) सामान्य आणि विदेशी भाषिक
(3) सर्वसाधारण आणि विशेष (4) भाषिक आणि शास्त्रीय

---

**कच्च्या कामासाठी जागा**

96. शासनाने राज्यातील उत्कृष्ट ग्रंथालये, कार्यकर्ते व कर्मचारी यांना दरवर्षी, संख्येने एकूण किती पुरस्कार प्रदान करण्याचे धोरण जाहीर केले आहे ?

(1) आठ (2) चौदा (3) बावीस (4) अठ्ठावीस

---

97. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी कोणा परदेशी प्रशिक्षित ग्रंथपालाची त्यांच्या राज्यातील ग्रंथालय विकास व ग्रंथालय शास्त्र प्रशिक्षणाच्या कार्यासाठी नेमणूक केली होती ?

(1) एडवर्ड-एडवर्डस् (2) व्युलम एडवर्ट (3) डब्ल्यु.अे. बोर्डन (4) मेलविल ड्युई

---

98. आय.एस्.बी.डी. चे पूर्ण रूप काय ?

(1) इंडियन सिस्टिम फॉर बिब्लिओग्राफिक डिस्क्रिप्शन
(2) इंडियन स्टँडर्डस् फॉर बुक्स ॲण्ड अदर डॉक्युमेंटस्
(3) इंटरनॅशनल स्टँडर्ड बिब्लिओग्राफिक डिस्क्रिप्शन
(4) इंडियन स्टँडर्डस् फॉर बिब्लिओग्राफिक डिटेल्स

---

99. खालीलपैकी कोणत्या राज्यात सार्वजनिक ग्रंथालय कायद्यामध्ये मद्य विक्रीवर आधारित कर संकलनाची तरतूद आहे ?

(1) कर्नाटक (2) केरळ (3) गोवा (4) तामिळनाडू

---

100. ग्रंथालयाचा अर्थसंकल्प म्हणजे काय ?

(1) ग्रंथालयाच्या वार्षिक खर्चाचा अंदाज बांधणे.
(2) ग्रंथालयाच्या वार्षिक जमेचा अंदाज बांधणे.
(3) ग्रंथालयाच्या गत वर्षीच्या जमाखर्चाचा तपशील.
(4) ग्रंथालयाकरिता नवीन वर्षासाठीच्या वार्षिक जमा-खर्चाचा अंदाज बांधणे.

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा**

**सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

Pick out the correct word to fill in the blank :

**Q. No. 201.** I congratulate you ________ your grand success.

(1) for (2) at (3) on (4) about

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) on" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**